


अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड




www.surajyadigital.com | बुधवार, दि.५ ऑक्टोबर २०२२ | वर्ष : २१ वे | अंक : ८ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

# होटगीरोडची अवघड चिमणी, माळढोकसाठी दुसरीकडे चारापाणी,



# विमानसेवेला सोपी आहे बोरामणी

✔ सुराज्य/सोलापूर

**सोलापूर शहराचे विस्तारीकरण होत आहे. सोलापूरला विमान सेवा चालू झाली पाहिजे; अशी लोकप्रतिनिधी यांची मागणी आहे. होटगीरोड विमानतळाला 'सिध्देश्वर'च्या चिमणीचा तर बोरामणी विमानतळाला माळढोकचा अडथळा आहे. चिमणीचा वाद न संपणारा आहे. मात्र एका माळढोक पक्षासाठी विमानतळ रखडवणे योग्य नाही. माळढोकच्या संवर्धनासाठी दुसरीकडे जागा देऊन बोरामणी विमानतळाचा विकास करण्यात येईल, असे सांगत नूतन पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी एकाचवेळी चिमणीला बगल देऊन माळढोकला पर्यायी जागा देऊ करत बोरामणी विमानतळाचा प्रश्न निकाली काढण्याची भूमिका जाहीर केली.**




पालकमंत्रिपदी नियुक्ती झाल्यानंतर मंगळवारी प्रथमच विखे-पाटील सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. यावेळी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकी त्यांनी विकास कामांचा आढावा घेतला. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी साहजिकच सोलापूरच्या विमानसेवेचा प्रश्न विचारला गेला. यावर उत्तर देताना विखे-पाटील म्हणाले, सोलापूर शहराचा विकास होत आहे. राष्ट्रीय महामार्गाचे जाळे निर्माण झाले आहे.

लोकप्रतिनिधींची सोलापूरला विमानसेवा चालू करण्याबाबत मागणी आहे. या मागणीचा विचार करता सध्या होटगीरोड विमानतळावरून विमानसेवा चालू करण्याबाबत चिमणीचा मोठा अडथळा आहे. हा वाद अनेक वर्षापासूनच आहे. त्यामुळे नव्याने जाहीर झालेल्या बोरामणी विमानतळाचा विकास करणे सोपे आहे.

## लाकडी माळढोक उडवता का?

जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आ. विजयकुमार देशमुख यांनी सोलापूरच्या विमानसेवेचा प्रश्न उपस्थित केला. खा. जयसिध्देश्वर शिवाचार्य महास्वामी यांनी होटगीरोड विमानतळावरून विमान सेवा चालू करण्याची मागणी केली. आ. प्रणिती शिंदे यांनी बोरामणी विमानतळाचा विषय पुढे आणला. जागा आहे, निधीसुध्दा असे सांगत बोरामणी विमानतळाचा विकास करण्याची मागणी पुढे रेटली. यावर जिल्हाधिकाऱ्यांनी खुलासा करत सद्य परिस्थिती विशद केली. विखे-पाटील यांनी 'एकच माळढोक आहे...?' त्यांचा बंदोबस्त करावा असे म्हणत 'लाकडी माळढोक तर उडवत नाही ना?' अशी उपरोधात्मक टीका केली.

## आंतरराष्ट्रीय विमानतळ रखडवे अयोग्य

बोरामणी विमानतळाच्या सर्व जागेचे भूसंपादन झाले आहे. २३ एकर जागेचा वाद आहे. ही जागा फॉरेस्ट विभागाची आहे. या जागेच्या बदल्यात दुसरी जागा फॉरेस्ट विभागाला दिली आहे. मात्र माळढोकचे कारण दाखवत हा प्रस्ताव फॉरेस्ट विभागाने फेटाळला आहे. संपूर्ण माळढोक अभयारण्यात फक्त १ माळढोक असल्याची माहिती आहे. एका माळढोक पक्षासाठी आंतरराष्ट्रीय विमानतळ रखडणे योग्य नाही, असा शेराही विखे-पाटील यांनी यावेळी मारला.

## नवी चर्चा... नवा वाद...

२३ एकर जागा माळढोक क्षेत्रातून वगळण्याचा प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना फॉरेस्ट विभागाला दिल्या आहेत. यापूर्वी अनेक गावे माळढोक क्षेत्रातून वगळली आहेत. त्याच धर्तीवर ही २३ एकरची जागा वगळून सोलापूरसाठी आंतरराष्ट्रीय विमानतळाचा विकास करण्याचा मानस विखे-पाटील यांनी व्यक्त केला. त्यामुळे होटगीरोड विमानतळाच्या विषयाला बगल देत बोरामणी विमानतळाचा विषय पुन्हा विखे-पाटील यांनी ऐरणीवर आणल्याने नवी चर्चा आणि वाद रंगण्याची शक्यता आहे.

## स्वागतार्ह निर्णय



सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी बोरामणी विमानतळाचा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन मंगळवारी दिल्याचे कळाले. त्यांचा हा निर्णय अत्यंत स्वागतार्ह आहे. राधाकृष्ण विखे-पाटील हे सहकार, शिक्षण आणि राजकारणातील अत्यंत जाणकार, अभ्यासू व संयमी नेतृत्व आहे. त्यांनी आज माळढोक पक्षी व वनविभागाच्या ३५ हेक्टर जमिनीचा प्रश्न सोडविण्याचे आश्वासन देऊन सोलापूर जिल्ह्याच्या विकासाचा मार्ग गेल्या अनेक वर्षांपासून जो थांबवला गेला होता, तो आजच्या निर्णयाने मार्गी लागण्याची शक्यता आहे. त्याबद्दल मी व्यक्तीश: सिध्देश्वर साखर कारखान्याचे सर्व सभासद व सोलापूरकर यांच्यावतीने त्यांना धन्यवाद देतो. **- धर्मराज काडादी**

# दोन महिन्यांच्या मुलाला घरातून पळवण्याचा प्रयत्न फसला

### ओरड होताच पाण्याच्या हौदात टाकून बुरखाधारी इसम पळाला

✔ **सोलापूर :** घरातील एका २ महिन्याच्या मुलाला उचलून घेऊन अनोळखी बुरखाधारी बाहेर पळाला. आईने आरडाओरड केली. तेंव्हा बुरखाधारी इसम त्या मुलाला पाण्याच्या हौदात टाकून पोबारा केला. ही घटना नई जिंदगी परिसरातील रिगल हॉटेल जवळ मंगळवारी सकाळच्या सुमारास घडली.

अदनान समद पटेल (वय २ महिने) असे पाण्यात बुडालेल्या मुलाचे नाव असून त्याला बेशुद्ध अवस्थेत सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मुलाचे वडील समद पटेल हे नई जिंदगी परिसरात राहण्यास असून ते पेंटिंगचे काम करतात. त्यांना दोन मुले आहेत. आज सकाळी ८ वाजेच्या सुमारास घराचा दरवाजा उघडा होता. त्यावेळी एक बुरखा परिधान केलेला इसम त्यांच्या घरात घुसला. आणि त्याने मोठ्या मुलास पकडण्याचा प्रयत्न केला. तो न सापडल्याने त्याने २ महिन्याच्या अदनानला उचलून घेतले. हा प्रकार पाहून मुलाच्या आईने आरडा ओरड केली. तेंव्हा त्या इसमाने बाळाला अंगणातील सिमेंटच्या पाण्याच्या हौदात टाकून पसार झाला. समद पटेल हे जागे होऊन मुलाला पाण्याच्या बाहेर काढले. आणि बेशुद्ध अवस्थेतील अदनानला त्वरित शासकीय रुग्णालयात दाखल केले. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे.

# आईने नमाजासाठी उठवले; मुलाने चाकू तुटेपर्यंत वार केले

### मनोरूग्ण तरूणाला लहान भावाने हातपाय बांधून ठेवले

✔ **सोलापूर :** मानसिक संतुलन बिघडलेल्या मोठ्या मुलाने जन्मदात्या आईच्या खांद्याच्या खाली व पाठीवर स्वयंपाक घरात वापरणारा चाकू अर्धा तुटेपर्यंत सपासप वार करून गंभीररीत्या जखमी केल्याची घटना दि.३ ऑक्टोबर रोजी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास गुरुवार पेठ कौतम चौक सोलापूर येथे घडली.याप्रकरणी लहान भाऊ मोहंमद फैजल अस्लम शेख (वय-१९, रा.गुरुवार पेठ, कौतम चौक) याने मोठ्या भावाच्या विरोधात जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली.

त्याच्या फिर्यादीवरून त्याचा मोठा भाऊ सुफियान अस्लम शेख (वय-२१,गुरुवार पेठ,कौतम चौक) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. दि.३ ऑक्टोबर रोजी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास सुफियान हा कोणाला न सांगता घरातून निघून गेला म्हणून त्याची ही नेहमीचीच सवय असल्यामुळे मोठा भाऊ मोहंमद व आई जरीना यांनी सुफियानचा सर्वत्र शोध घेतला परंतु तो मिळून आला नाही म्हणून पोलीस ठाण्यात तक्रार देण्यास जात असताना अचानक तो घरात आला. त्यावेळी मोठ्या मुलाने व आईने त्याची समजूत काढून त्याला डॉक्टरांकडे उपचारासाठी नेऊन घरी परत आणले. त्यानंतर आईने त्याची समजूत काढून घरात झोपण्यास सांगितले. त्यावेळी सोफियान हा नेहमीच मानसिक संतुलन बिघडल्यासारखे वागत होता. आई त्याची समजूत काढायची म्हणून तो नेहमीच आईवर राग धरून असायचा. याचेच कारण धरून व मानसिक संतुलन बिघडल्याच्या कारणावरून त्याने आपल्या जन्मदात्या आईवर चाकूने सपासप वार केला.त्यावेळी आई जरिना रक्ताच्या थारोळ्यात जखमी अवस्थेत गॅलरीत पडली. त्यावेळी सोफियान घराच्या दरवाजाचे लॉक तोडून पळून जाण्यास निघाला.त्यावेळी लहान भावाने व शेजारच्या लोकांच्या मदतीने मोठ्या भावाचा पाठलाग करून पकडले.दरम्यान रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या आईला तात्काळ उपचारास दाखल करून तब्येत चिंताजनक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.या घटनेची नोंद जेलरोड पोलीस ठाण्यात झाली असून, या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक चिंताकिंदी हे करीत आहे.

### ■ अन् अशी घडली घटना

दि.४ ऑक्टोंबर रोजी सकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास दोन्ही मुलांना आईने नमाज पडण्यासाठी उठवले. त्यावेळी सुफियान याने मी नमाज पडणार नाही असे सांगून रागाने पुन्हा झोपी गेला.त्यावेळी सुफियानची आई घराची साफसफाई करत असताना सकाळी सहा वाजता त्याने आईवर चाकू अर्धा तुटेपर्यंत सपासप वार करून गंभीररित्या जखमी अवस्थेत सोडून पळून गेला.

### ■ लहान भावाने बांधले मोठ्या भावाचे 'हात-पाय'

सुफियान शेख हा आईवर चाकूने वार करून रक्ताच्या थारोळ्यात सोडून दरवाजाचे लॉक तोडून लहान भावाला ढकलून पळून जात असताना,त्याला मोठ्या भावाने व शेजारी राहणाऱ्या लोकांच्या मदतीने पकडून त्याचे हातपाय लहान भाऊ मोहंमद याने दोरीने बांधले.

# पेट्रोल पंप मिळवून देण्याच्या बहाण्याने युवकाची १३ लाख रूपयांची फसवणूक

✔ **बार्शी :** कुसळंब गावातील योगेश विजय पाटील या युवकाचे इंडियन ऑईल पेट्रोलियमचा पेट्रोल पंप मिळवून देतो असे सांगून १३ लाख ९५ हजार ७०० रुपयांना फसवणूक करण्याचा प्रकार घडला आहे.

याप्रकरणी बार्शी तालुका पोलीस स्टेशनमध्ये पाटील यांच्या फिर्यादीवरून अज्ञात इसमाविरोधात भा.दं.वि. कलम ४१९, ४२० सह माहिती तंत्रज्ञान (सुधारणा) अधिनियम २००८ चे कलम ६६सी, ६६डी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास सपोनि शिवाजी जायपात्रे करत आहेत. याबाबत दिलेल्या फिर्यादीमध्ये पाटील यांनी अज्ञात आरोपीने फोन पे वरून ऑनलाईन त्यांचे दिलेल्या बँकेच्या अकाऊंट नंबर एस.बँक शाखा-बांद्रा वेस्ट, मुंबई च्या खाते क्र.१०२५५२०००००००१२ वर भरण्यास सांगून फिर्यादीची फसवणूक केल्याचे म्हटले आहे. फिर्यादीने गुगलवरून सर्च करताना इंडियन ऑईल पेट्रोलियमचा युआरएल कोड नं. http://petrolpumpsdistributor.in/ wp-login.php असा होता, आरोपीचा व्हॉटसअॅप मोबाईल नंबर ९३९४४२११२८ व ९८७५४५६४७२ असा असून फोन पे व गुगल पे नंबर हेच आहे. फिर्यादीने आरोपीस गुगल पे व फोन पे वरून आय.डी.एफ.सी. बँक शाखा-बांद्रा, मुंबईच्या खाते क्र.१००६७९६३५८४ या खात्यावर पैसे पाठविले आहेत. शहराबरोबरच ग्रामिण भागातही अशा प्रकारचा सायबर क्राईम घडल्यामुळे खळबळ उडाली आहे.

### तांदूळवाडी येथे शॉर्टसर्किटने अंथरूण पेटून १ जखमी

✔ **सोलापूर :** तांदुळवाडी (ता.दक्षिण सोलापूर) विजेच्या शॉर्टसर्किटमुळे उडालेल्या ठिणग्याने अंथरुणाला आग लागून एक जण भाजून जखमी झाला. हीघटना आज मंगळवारी पहाटेच्या सुमारास घडली. कृष्णात रामचंद्र गायकवाड (वय ५९ रा. तांदुळवाडी) असे किरकोळ भाजलेल्या इसमाचे नाव आहे. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. ते घरात झोपले होते. पहाटे दोनच्या सुमारास वायरच्या शॉर्टसर्किटच्या ठिणग्या अंथरुणात पडल्या. त्यामुळे अंथरूण पेटून त्यांचा हात आणि पाय भाजला.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आम्ही आणखी किती दिवस खोके-खोके ऐकायचे?

| कल्याण |
|---|
| 348-58-459 |

| मेन बाजार |
|---|
| 299-03-355 |

# पालकमंत्र्यांचा पालिका आयुक्तांना दणका
# नळ तोडणी मोहिमेला दिली स्थगिती

✔ **सोलापूर :** पालिका प्रशासनाच्या वतीने शहरातील सार्वजनिक नळ बंद करण्याची मोहीम चालू केली आहे. या मोहिमेला स्थगिती देण्याची मागणी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत लोकप्रतिनिधी केली. या मोहिमेला स्थगिती देण्याचे आदेश पालिका प्रशासनास देत पहिल्या बैठकीत पालकमंत्री विखे पाटील यांनी पालिका आयुक्तांना दणका दिला आहे. नूतन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समिती बैठक झाली.



या बैठकीत शहर मध्यचे आमदार प्रणिती शिंदे, आ. विजयकुमार देशमुख, आ.सुभाष देशमुख शहराच्या प्रश्नावर आक्रमक झाल्याचे दिसून आले. या लोकप्रतिनिधींनी सोलापूर शहरातील रखडलेल्या विविध प्रश्न उपस्थित करत अनेक अधिकाऱ्यांना उघडे पाडले. आमदार प्रणिती शिंदे यांनी आयुक्तांनी सार्वजनिक नळ बंद करण्याची मोहीम हाती घेतली आहे. नळ बंद करून चार ते पाच जणांमध्ये नळ घेण्याची सक्ती करत आहेत. यामुळे हातावर पोट असणाऱ्यांचे हाल होणार आहेत, असे सांगत आयुक्तांच्या नळ कट करण्याच्या मोहिमेला विरोध करत नळ घेण्यासाठी पैसे भरण्यासाठी टप्पे करण्याची मागणी लावून धरली. याला आ. सुभाष देशमुख यांनी देखील साथ दिली. पालकमंत्री विखे पाटील यांनी पालिका आयुक्तांना याबाबत विचारणा केली असता सार्वजनिक नळा माध्यमातून मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात आहे. त्यामुळे पाणी टंचाई निर्माण होत आहे. अमृत योजनेंतर्गत घर तिथे नळ योजन आहे. या माध्यमातून नळ दिले जाणार असल्याचा खुलासा केला.

मात्र लोकप्रतिनिधींनी सदरची मोही बंद करण्याची मागणी करताच दसरा दिवाळी सण तोंडावर आहे त्यामुळे जो पर्यंत पुढील आदेश येत नाहीत तो पर्यंत कोणतीही मोहीम घेऊ नका असे सांगत नळ तोडणी मोहिमेला स्थगिती दिल्याचे जाहीर केले.

### जि.प.च्या शाळा मनपाकडे हस्तांतरणाचा प्रस्ताव करा : पालकमंत्री

महापालिका हद्दीतील जिल्हा परिषदेच्या शाळा मनपाकडे हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव तात्काळ तयार करा असे आदेश पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी झेडपीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांना दिले. शहरातील जिल्हा परिषदेच्या शाळा मनपाकडे हस्तांतरित कराव्यात अशी मागणी आ. सुभाष देशमुख गेल्या चार वर्षांपासून करीत आहेत. जिल्हा नियोजन समितीच्या मंगळवारी झालेल्या बैठकीत त्यांनी हा मुद्दा उपस्थित केला. जिल्हा परिषद सध्या प्रशासक आहेत. दिलीप स्वामी यांनी प्रस्ताव तयार करावा आम्ही तो शासनाकडून मंजूर करून घेऊ असे पालकमंत्री विखे पाटील यांनी सांगितले. आ. देशमुख यांनी या निर्णयाबद्दल विखे पाटील यांचे आभार मानले.